दै. मराठवाडा नेता दि. 10.06.25

# नांदेड परिक्षेत्रात अवैध धंदे करणाऱ्या २५५ जणांवर कारवाई

## विशेष पोलिस उपमहानिरीक्षक उमाप यांच्या आदेशानुसार कारवाई

नांदेड : (म नेता)

येथील विशेष पोलिस उपमहानिरीक्षक यांच्या परिक्षेत्रातील चार जिल्ह्यांत ८ जून रोजी करण्यात आलेल्या मास रेड अवैध धंदे करणार्या २५५ जणांना पकडण्यात आले असून २५५ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या या कारवाईत ७ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्यांत अवैध धंदे करणार्या विरोधात दुसऱ्या टप्प्यात मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेत परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर जिल्ह्यातील पोलिस अधिक्षक यांना अवैध धंदे करणार्या विरोधात कारवाई करण्याचे आदेश दिले होते. नांदेड परिक्षेत्रातील सर्व पोलिस अधिक्षक यांनी ८ जून रोजी अवैध दारू, हातभट्टी या विरोधात एका मास रेडचे आयोजन केले होते. नांदेड परिक्षेत्रातील नांदेडचे पोलिस अधिक्षक अबिनाश यांनी विशेष मोहिम राबवून ११५ जणांविरुद्ध ११५ गुन्हे दाखल करुन ४ लाख २६ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. परभणी येथील पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करत ४६ जणांविरुद्ध ४६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हिंगोली येथील पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली धाडी टाकत पोलिस २७ जणांविरुद्ध २७ गुन्हे दाखल केले आहेत. लातूरचे पोलिस अधिक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ६७ ठिकाणी धाडी टाकून ६७ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

नांदेड परिक्षेत्रातील मास रेड मध्ये पोलिसांनी ७ लाख ७५ हजार ७७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरील कारवाईत चार जिल्ह्यांतील १६१ अधिकारी व ६९९ पोलिस कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. तसेच या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे सर्व पोलिस निरीक्षक व कर्मचारी सहभागी झाले होते. विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशानुसार ८ जून रोजी परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड जिल्ह्यात एकाच दिवशी दारु, हातभट्टी व अवैध धंदे यांच्या विरोधात मास रेडचे आयोजन करण्यात आले होते.